E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# मध्यकालीन चलन व्यवस्था - एक अभ्यास

**प्रा. दत्ता विठ्ठलराव साबळे,**
सहायक प्राध्यापक
आर. वाय. पी. कला महाविद्यालय, विहामांडवा,
ता. पैठण, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर

---

## प्रस्तावना:

भूतकाळात घडलेल्या घटनांची सुसंगत व क्रमबद्ध पध्दतीने केलेली मांडणी म्हणजे इतिहास होय. आणि हा इतिहास जाणून घेण्यासाठी त्या गतकालीन घटनांचे वर्गीकरण करणे भाग पडते. त्यात सर्वसामान्यपणे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, प्रादेशिक इत्यादी प्रकारात विभाजन केले जाते.

नाणी हे इतिहासाचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. इतिहासाची साधने अभ्यासतांना नाणकशास्त्राचा उपयोग करण्यात येतो. ज्याप्रमाणे इतिहास लेखनासाठी कागदपत्रांची आवश्यकता असते त्याचप्रमाणे नाण्याची सुध्दा आवश्यकता असते. नाणी ही सोने, चांदी किंवा इतर मिश्र धातुचीही बनवलेली असतात. नाण्याच्या मदतीने एखाद्या देशाचा इतिहास लिहिणे सोपे होते. नाण्यामुळे तत्कालीन कालखंड, राजाची नावे तसेच त्या राजांनी कोणत्या प्रदेशावर राज्य केले याची माहिती मिळू शकते. नाण्यांच्या आधारे जी माहिती मिळते ती इतर साधनातून पडताळून पाहिली जाते. नाण्याच्या सहाय्याने तत्कालीन राजांचा व घटनांचा क्रम ठरविणे सोयीचे होते. नाण्यावर जर राजाचे चित्र असेल तर त्यावरुन त्या राजाच्या पोशाखाची कल्पना येते. काही नाण्यांच्या आधाराने तत्कालीन राजांची आर्थिक स्थिती, शासनपध्दती, धार्मिक स्थिती इत्यादीबद्दल माहिती मिळते. पूर्वीच्या काळी राज्यारोहण किंवा युद्धात विजय प्राप्त केल्यानंतर आनंद द्विगुणीत करण्यासाठी राजे, महाराजे नवी नाणी बनवत. त्यावर काही शब्द किंवा प्रतिमा कोरलेल्या असत. त्यामुळे त्यावरून तत्कालीन आर्थिक परिस्थितीचा अंदाज बांधता येतो. नाण्याच्या धातूवरुन तत्कालीन राजाच्या आर्थिक परिस्थितीचा अनुमान लावता येतो. अलीकडील काळात कागदी नोटा आल्यामुळे नाणी दुय्यम ठरली आहेत. त्या काळात कागदी नोटा नव्हत्या म्हणून नाणी हेच अर्थव्यवस्थेचा आधार होते.

## उद्दिष्टे:

1 मध्यकालीन अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे

2 मध्यकालीन आर्थिक परिस्थिती आढावा घेणे

3 **गृहीतके:**

मध्यकालीन चलन व्यवस्था स्थित्यंतराचा अभ्यास करणे

मध्यकालीन अर्थव्यवस्था मिश्र स्वरूपाची होती

मध्यकालीन अर्थव्यवस्था शेतीवर आधारित होती

मध्यकालीन चलन व्यवस्थेत स्थित्यंतरे होत गेली.

## विश्लेषण:

### सुलतानशाहीकालीन चलनः

**१) अल्तमशचे चलन :**

"सुलतानशाही काळातील जी नाणी उपलब्ध आहेत त्यावरून त्यांची शासन व्यवस्था, सामाजिक व आर्थिक जीवन यावर प्रकाश पडतो. या काळात प्रामुख्याने मुसलमानी राजांची नाणी आणि हिंदू राजांची नाणी असे नाण्यांचे दोन प्रकार दिसून येतात. सुलतानच्या नाण्यावर साधारणतः पहिल्या चार धर्मगुरु खलीफांची नावे, भारतातील सुलतानाचे नाव, नाणी पाडलेले वर्ष, तसेच त्यांची टाकसाळ असलेले शहर याबद्दल माहिती मिळत असल्याने सुलतानाचे नाव खलीफा आणि त्या सुलतानमधील संबंध, त्याचा राज्यविस्तार वगैरे गोष्टीबद्दलचा इतिहास लिहिता येतो. अल्तमशने प्रथम आपल्या साम्राज्यात रुप्याची नाणी टंका पाडण्यास सुरुवात केली. १२२८ नंतरच्या नाण्यावरून तो प्रत्यक्षात सुलतान असून देखील घटनात्मकदृष्ट्या खलीफाच्या अधीपत्याखाली होता है कळते.

सुलतानशाही काळात प्रामुख्याने मुस्लिम राजांची नाणी दिसून येतात. त्यांच्या नाण्यांवरून तत्कालीन सामाजिक, आर्थिक जीवन व शासन व्यवस्था याविषयी माहिती प्राप्त होते. तत्कालीन नाण्यांवर सुलतानाचेनाव, वर्ष व टाकसाळ असलेले शहर कोरलेले असल्याने ही माहीती उपलब्ध होते. रुप्याची नाणी टंका पाडण्याची सुरुवात सर्वप्रथम अल्तमशने केली.

**२) अल्लाउद्दीनचे चलनः**

"अल्लाउद्दीनने आपल्या नावाच्या चांदीच्या नाण्यांवरूनपदव्या घातल्या होत्या. त्याचा मुलगा कुतुबुद्दीन मुबारक याने एक पाऊल पुढे टाकले आणि आपल्या नाण्यांवर खलिफाला अधिक दुखावणाऱ्या पदव्या लिहून घेतल्या. उदा. 'इस्लामचा सर्वोच्च प्रमुख', 'स्वर्ग आणि पृथ्वीच्या स्वामीचा खलीफा', 'ईश्वराचा खलीफा' आणि 'सर्वोच्च इमाम' या पदव्या स्वतःला लावून घेतल्या. चौकोनी नाणी यावेळी मुसलमान अमलात प्रथमच पाडली गेली. अल्तमश, बल्बन आणि खिलजी सुलतानांच्या नाण्यांवर आढळणाऱ्या टाकसळीच्या गावांच्या नावामध्ये बिलाद-उल-हिंद, सुलतानपूर, दार-उल-इस्लाम, किल्ला देवगीर आणि कुतुबाबाद यांचा अंतर्भाव होता.

सुलतानकालीन अल्लाउद्दीन खिलजीने त्याच्या काळात चांदीच्या नाण्यांवरुन खलिफाचे नाव काढून त्याच्या नावाचे गौरवोदगार कोरले त्याच्या मुलाने एक पाऊल अधिक पुढे टाकून इस्लामचा सर्वोच्च प्रमुख, ईश्वराचा खलिफा आणि सर्वोच्च इमाम या पदव्या स्वतःला लावून घेतल्या. सोन्याची चौकोनी नाणी प्रथमच पाडली गेली या नाण्यांवर टाकसाळीच्या शहराचा उल्लेख आवर्जुन केलेला असे.

**३) कृष्णदेवर चालन :**

कृष्णदेवरायाने प्रचारात आणलेले दैवत प्रकारातील प्रताप (अर्धवराह) हे सुवर्णनाणे 'दुर्गा वराह' या नावाने संबोधले जाई. दुर्गावराह २६ ग्रेन वजनाचे असून त्याच्या मुख्य बाजूस हातात शंख व चक्र धारण केलेल्या आसनस्थ विष्णूचे चित्र आहे. आणि नाण्याच्या मागील बाजूस नागरी लिपीत 'श्री प्रताप कृष्णराय' ही अक्षरे कोरलेली आहेत.दक्षिण भारतातील होन या सुवर्णनाण्याची विलक्षण लोकप्रियता लक्षात घेऊन दक्षिणेतील मुस्लिम शाहयांनी विजयन गरचे हिंदू साम्राज्य जरी नष्ट केले, तरी अच्युतराई, देवराई, रामचंद्रराई आणि शिवराई हे विजयनगर साम्राज्याचे होन विजयनगर साम्राज्याच्या प्रदेशात चलनात कायम ठेवले.

विजयनगर साम्राज्यात कृष्णदेवहाय हे सुप्रसिध्द राजा होऊन गेले. त्यांनी काढलेले सुवर्णनाणे 'दुर्गा वराह' नावाने संबोधले जाई. हे सुवर्णनाणे २६ ग्रेन वजनाचे असून त्याच्या मुख्य बाजूस आसनस्थ विष्णूचे चित्र व दुसऱ्या बाजूस 'श्री प्रताप कृष्णराय' ही नागरी लिपीतील अक्षरे कोरलेली आहेत. दक्षिणेकडील मुस्लिम शासकांनी हिंदूचे राज्य नष्ट केले मात्र तरीदेखील अच्युतराई, देवराई,

रामचंद्रराई आणि शिवराई हे चलन कायम ठेवले.

**मुघलकालीन चालन :**

**१) बाबर व हुमायून यांचे चलनः**

बाबर हुमायून व यांनी शारुखी नावाने ओळखली जाणारी चांदीची नाणी पाडली होती. ही नाणी म्हणजे मध्य आशियातील त्यांच्या नाण्यांची दुसरी प्रतिकृतीच होती. ही नाणी मुख्यतः आग्रा, दिल्ली, लाहोर व काबूल येथे पाडली जात. बाबरने लाहोर येथे ६९ ग्रेन वाजनाच्या चांदीच्या नाण्यांवर मुख्य बाजूस एका वर्तळाच्या आत अबुबकर, उमर, उस्मान व अली या चार खलिफांची संक्षिप्त नावे व त्यांच्या पदव्या लिहीलेल्या होत्या. या नाण्यांच्या मागील बाजूस सर्वश्रेष्ठ सुलतान, सुप्रसिध्द बादशहा हा मजकूर व बादशहाचे नाव आणि नाणी पाडण्याचे वर्ष व खालील अर्ध्या भागात 'सर्वश्रेष्ठ ईश्वर राज्य व सार्वभौम चिराय करो' असा मजकूर व टांकसाळीच्या गावाचे नाव ही लिहीली होती."मुघल काळात बाबर व हुमायनने शारुखी नावाची, चांदीची नाणी पाडली. बाबरने ६९ ग्रेन वजनाचे चांदीचे नाणे पाडले. त्यावर मुख्य बाजूस खलिफांची नावे तर दुसऱ्या बाजूस 'सर्वश्रेष्ठ ईश्वर राज्य व सार्वभौम चिरायू करो' असा मजकूर व टाकसाळीच्या गावाचे नाव लिहीलेले होते.

**२) शेरशहासुरी व अकबराचे चलनः**

शेरशहा यांनी मिश्रधातूची नाणी बंद करून 'सोन्याचा टंका', 'चांदीचा रुपया' व 'तांब्याचा पैसा' आस्तित्वात आणला. भारतीय चलनाला शेरशहा यांनी रुपयाची दिलेली देणगी म्हटले तरी वावगे ठरणार नाही. अकबराच्या काळात तांब्याचे नाणे 'टंका' हे निर्माण केले होते." मिश्रधातूची नाणी बंद करून शेरशहा सुरी ने सोन्याचा टंका व चांदीचा रुपया ही नाणी पाडली. रुपया ही देन शेरशहासुरीकडून भारताला मिळाली. अकबराने सोन्याचे 'मुहर' हे नाणे व व चांदीचे 'टंका' आहे नाणे बनवले. अकबराच्या काळात मोठ्या प्रमाणात नाण्यांचा वापर सुरु होता.

**३) मुघल चलनाची वैशिष्ट्ये :**

चांदीचा रुपया या नाण्याचे प्रमाणभूत वजन व धातूची शुध्दता ही मुघलांच्या काळामध्ये कटाक्षाने पाळली गेली व ते एकंदरीत नाणे व्यवहारामध्ये चलन परिमाण म्हणून मान्यता पावले. आधुनिक भारताला मुघलांनी दिलेली ही देणगी होय.

मुघलकाळातील नाण्याचे प्रमाणभूत वजन वधाची शुध्दता हे उल्लेखनिय होते.

## शिवकालीन चलन :

आपल्या वादळी धामधुमीच्या काळात शिवाजी महाराजांना नाण्यांसारख्या गोष्टीसाठी देण्यासारखा वेळच नव्हता आणि तरीसुध्दा त्यांनी विशेषतः १६७४ मध्ये राज्याभिषेक करून घेतल्यानंतर स्वतःची नाणी पाडलेली आढळतात. त्यांनी स्वतःचे 'शिवराई' हे सोन्याचे नाणे पाडून घेतले. सोन्याचे 'शिवराई होन' ४२.१२ ग्रेन वजनाचा होता. त्या नाण्याच्या मुख्य बाजूस 'श्री राजा शिव' असे शब्द छापलेले असत व मागील बाजूस 'छत्रपती' असे लिहीलेले असे. शिवाजी महाराजांनी चांदीची नाणी जवळजवळ पाडलेलीच नव्हती. शिवाजी महाराजांची तांब्याची नाणी विपुलतेने आढळून येतात. तांब्याचे प्रमाणभूत नाणे म्हणजे 'टक्का' हे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतःच्या शौर्यबळावर मराठा साम्राज्य स्थापन केलेले होते. सततच्या लढायांमुळे त्यांना नाणी पाडण्याकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नसे तरी देखील त्यांनी 'शिवराई' हे नाणे पाडले. त्याचप्रमाणे तांब्याची नाणीही मोठ्या प्रमाणात पाडली होती त्यास 'टक्का' म्हटले जाई. चांदीची नाणी ही जवळपास नव्हती.

"शिवकाळात सुवर्ण, रुपे आणि तांबे या धातूंची नाणी चलनात होती. शिवाजी राजांच्या खजिन्यात चार लाख शिवराई होन होते. राज्य व्यवहारकोशात 'प्रताप' 'धरण' 'चवल' आणि 'दुबल' असे होनाचे लहान विभाग दिलेले आहे. सध्याच्या स्थितीत 'होन' अत्यंत दुर्मीळ असून, भारतात फक्त तीन होन उपलब्ध आहेत. यापैकी अनुक्रमे एक राष्ट्रीय संग्रहालय दिल्ली, दुसरा प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम मुंबई, तर तिसरा साताऱ्यास आहे. शिवाजी महाराजांच्या खजिन्यात विविध प्रकारची नाणी होती त्यात गंभार, मोहर, सणगिरी, शिवराई, पानशाही, देवराई, अच्युतराई, रामचंद्रराई

इत्यादी नाणी होती. तसेच सोन्यांच्या कांबी, फलम आणि लहान सुवर्णनाण्यांचा उल्लेख आढळून आढळून येतो."

"महाराष्ट्रात ऐतिहासिक दस्तऐवज आणि बखरीतून शिवराई होन, फनम, चक्रम, पादशाही होन निशाणी होन आणि होनांचे इतर प्रकार यांचा उल्लेख आढळतो. विजयनगरचे साम्राज्य सोळाव्या शतकातच अस्तंगत झाले होते, पण अच्युतराई, रामचंद्रराई, देवराई इत्यादी त्या सत्तेची सोन्याची नाणी शिवाजी महाराजांच्या खजिन्यात मोठ्या प्रमाणावर होती.""ऐतिहासिक दस्तऐवज व बखरीतून तसेच सभासदातील माहितीच्या आधारे शिवकालीन चलनात शिवराई, होन, फनम, पादशाही होन, निशाणी होन तसेच होनांचे इतर प्रकार दिसून येतात. विजयनगर साम्राज्याच्या अस्तानंतर देखील रामचंद्रराई, अच्युतराई, देवराई इत्यादी त्या सत्तेची नाणी शिवाजी महाराजांच्या खजिन्यात असल्याचे आढळून येते.

शिवकाळात तांबे, सोने व चांदीची नाणी चलनात होती. शिवराई होन व मोहर ही सोन्याची नाणी होती. रुपया, रियाल, अश्रफी, अब्बासी, महमुदी, लारी व टका ही चांदीची नाणी होती. पैसा, तिरुका, दाम, रुका, जितल किंवा चितल ही तांब्याची नाणी होती. नुकरा होन हे रुप्याचे नाणे होते. शिवकाळात रायगडावर टाकसाळ होती.

शिवाजी महाराजांच्या काळात टाकसाळ ही रायगडावर होती. तसेच सोने, चांदी, तांबे व रुप्याचे नाणे हे चलन व्यवहारात देवाण घेवाणीसाठी होते.

**पेशवेकालीन चलन :**

अठराव्या शतकात सातारकर छत्रपतींच्या अंमलाखालील प्रदेशात त्यांच्या परवानगीने पेशव्यांची चलनव्यवस्था अस्तित्वात होती. पेशव्यांच्या अंमलाखालील प्रदेशांत एका रुपयांच्या भाग मूल्यांकांना अधेली (आठ आणे अर्थात अर्धा रुपया), चवली (चार आणे अर्थात पाव रुपया) अशी नावे तर तांब्यांच्या नाण्यांमध्ये ढबू (दोन पैसे) व धेला (अर्धा पैसा) असे मुल्यांक असत. छत्रपतींच्या अंमलाखालील प्रदेशात त्यांच्या प्रवानगीने पेशव्यांची चलनव्यवस्था दिसून येते. त्यात आठ आणे, चार आणे अर्थात अनुक्रम अधेली, चेवली व तांब्याच्या नाण्यांत ढबू व धेला ही नाणी दिसून येतात.

पेशवेकाळात छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरु केलेले चलनाचे परिमाण 'होन' या नाण्याचा त्याग करून त्यासाठी प्रमाणकृत नाणे म्हणून रुपया या नाण्याची निवड केली. पेशव्यांची स्वतःची अशी नाव घेण्यासारखी नाणे पध्दत नव्हती. या काळात चांदीची नाणी चलनात होती. या काळात रहीमतपुरी, मलकापुरी, चांदवड, चिंचवड, सुरती, इंग्लिश, बागलकोटी, महंमदशाही, भातवडी शाहू-सिक्का, बाई-सिक्का, पुणे-चलन, पुणे-सिक्का, कल्याण-सिक्का, जरी पटका इत्यादी नाणी चलनात होती. "12

पेशवेकाळात शिवाजी महाराजांच्या काळातील होन नाणे न वापरता त्याऐवजी 'रुपया' हे नाणे वापरात आणले. या काळात चांदीची नाणी चलनात होती.

पेशव्यांच्या काळातील नाण्यांचा इतिहास म्हणजे एकंदरीत नाणे पध्दतीच्या ऱ्हासंचा इतिहास होय. त्याचप्रमाणे तो भेसळीचा व अधोगतीचा इतिहास होय. खाजगी व्यक्तींना नाणी पाडण्याचे परवाने देण्याचे प्रमाण अधिकच वाढले त्यामुळे बेकायदेशीरपणे नाणी पाडणे सुध्दा चालू झाले. पेशवे सरकार, टाकसाळीतून चालणाऱ्या गैरव्यवहारांना आळा घालण्याचा प्रयत्न करून सुद्धा टांकसाळीवर म्हणण्यासारखे नियंत्रण राखू शकले नाही. शिवाजी महाराजांनी सुरु केलेले चलनाचे परिमाण 'होन' याचा त्याग करण्यात येऊन प्रमाणभूत नाणे म्हणून त्याजागी रुपया या नाण्याची निवड झाली.

पेशवेकाळात खाजगी व्यक्तींनाही नाणे पाडण्याचे परवाने दिल्यामुळे नाण्यांमध्ये ती ती शुध्दत्ता किंवा नाणे पाडण्यासंबंधीचा वचक राहीला नाही; जी शुद्धता आणि वचक शिवरायांच्या काळात होता. नंतर पेशवे सरकारने गैरव्यवहारावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला परंतु ते पाहिजे तितक्या प्रमाणात होऊ शकले नाही.

**निष्कर्ष :**

भारतीय नाण्यांचा इतिहास इ.स. पूर्व ६ व्या शतकापासून मानला गेला आहे. 'आहत' ही सर्वात जुनी भारतीय नाणी होती. आदिमानवाच्या काळात चलन अस्तित्वात नव्हते आणि त्याची गरजही नव्हती. त्याऐवजी काही प्रमाणात वस्तुविनिमय होता. कालांतराने विशिष्ट वजनाच्या, आकाराच्या, धातूच्या नाण्यांची सुरुवात तत्कालीन राजांच्या देखरेखीखाली पाडली गेली. भारतीय चलनाचा अभ्यास करताना असंख्य सत्ता व त्यांचाकाळ यांचा मोठा इतिहास उभा राहतो. स्वातंत्र्यापर्यंत एकछत्री अंमल कधीही नव्हता. इतिहासाचा अभ्यास करतांना आवश्यक मानल्या जाणाऱ्या साधनांमध्ये त्या-त्या काळातील नाण्यांचा समावेश होतो. आर्थिक विनिमय, व्यापार-उद्दीम, राजकीय यंत्रणा, तत्वज्ञान धार्मिक कल्पना, कलाकुसर, तत्कालीन राजाचे वैभव, कौशल्य प्रगती इत्यादी विविध पैलूंविषयी ऐतिहासिक नाणी पुरावा म्हणून आपली भूमिका बजावतात. नाण्यांमुळे प्राचीन तसेच मध्ययुगीन राजांची नावे, त्यांचा काळ, त्यांची क्रमवारी, राज्यांची स्थाने, त्यांचा राज्याभिषेक इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण माहिती मिळते.

जुन्या नाण्यांचा अभ्यास करण्यासाठी काही संस्थांनी विविध काळातील राजांच्या नाण्यांचा संग्रह करुन सोयी उपलब्ध करून आहेत तर काही विद्यापिठांनी 'नाणेशास्त्र' विषयात पदव्युत्तर अभ्यास सुरु केला आहे.

**संदर्भ:**

१) साळुंके आर. एम., मध्ययुगीन भारत (१२०६-१७०७), प्रशांत पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती जून २०१६, पृष्ठ क्र. २३

२) चिटणीस कृष्णाजी नागेशराव, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भागः ४, प्रकाशिका राधा चिटणीस, पहिली १९८५, पृष्ठ क्र.४.

३) आचार्य धनंजय, मध्ययुगीन भारत (१०००-१७०७), प्रकाशक ललिता पुराणिक, प्रथमावृत्ती एप्रिल २००८, पृष्ठ क्र.१४०,१४१

४) साळुंके आर. एम., मध्ययुगीन भारत पूर्वोक्त पृष्ठ क्र. १५०

५) कठारे अनिल, भारताचा इतिहास (१२०६ ते १७५६), प्रशांत पब्लिकेशन्स, प्रकाशक रंगराव पाटील, प्रथम आवृत्ती ऑक्टोंबर २०१८, पृष्ठ क्र.22.